राज्यसेवा (मुख्य) परीक्षा -2015 **IO6**

परीक्षा दि. 12 सप्टेंबर, 2015 **2015**

# विषय : मराठी ( अनिवार्य ) 14776

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा** **एकूण गुण : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** **कालावधी : 3 तास**

**सूचना :**

*(i)* **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.

*(ii)* प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

*(iii)* तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.

*(iv)* उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

*(v)* उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

**1.** दिलेल्या विषयावर 1000 शब्दांचा निबंध लिहा. **50**

‘भाषेचे व्याकरण : म्हणजे भाषेचे चारित्र्य’.

www.reliableacademy.com 9222333999

**P.T.O.**

2. खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. 25

While third Anglo-Maratha war was still in progress, Elphinstone was anxious to find a way to deal with highly mobile Maratha forces that were stirring country like a whirlwind. With the consultation of Munroe, he took a futuristic decision and issued a lengthy proclamation. The copies of the proclamation were publicized all over Maharashtra. This proclamation censures Bajirao II as an incompetent individual and spells out the objectives of British rule. The benevolent nature of forthcoming English rule has been emphasized. This proclamation helped in reducing the suspicions about English rule in the minds of people. The fear, that deserting the side of Bajirao II will invite his wrath and retribution, vanished and every sardar, jahagirdar, inamdar and sarajamdar got busy in safeguarding own position. The assurance by English, that the watans of those who abandon the Bajirao's side-within next two months-would be preserved, helped in isolating him. The rout at Shivni and the defeat of Panshes at Solapur were mainly because of Elphinstone's proclamation. People suffering regular harassment of plundering rides by Shinde and Holkars looked at the proclamation as a relief and soon the proclamation became popular. The perception generated after the battle of Gopalashthi was that the rule of Peshwas has vanquished and English are well in control of situation.

Elphinstone realized that the religious sentiments were strong during the Peshwa rule, thus, he assured in the proclamation that there will be continuation in the religious policies of erstwhile rulers. He personally visited Wai to reassure the Brahmins who had migrated there from Pune and to gain their support. There he held an assembly of renowned scholars and pundits and rewarded them just as Bajirao did. The Brahmins at Pune were also taken in confidence and rewarded.

After placating Brahmins, the next important group that mattered was Marathas. Marathas were more concerned about their martial status. They were pacified by creating a nominal kingship at Satara. There were as many as 33600 soldiers in Maharashtra at that time. However, they were leaderless. They were cut off from any contact with political leadership. The only options left with them were either to engage in agriculture or to join the British army. Most of them took to the agriculture but few kept on rebelling against British. Elphinstone did not thought it prudent enough to completely disarm Marathas as this might hurt their self-respect and generate feeling of alienation from traditional profession. They were given permits to bear arms and made responsible for the security of villages. Elphinstone was not interested in suppressing the martial spirit of this people as he thought that they could be helpful for law and order purpose and may even be used in warfare.

www.reliableacademy.com 9922335999

**3.** खाली दिलेल्या उताऱ्याचे 1/3 शब्दात सारांशलेखन करा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. **15**

**सूचना :** विहित शब्दमर्यादेपेक्षा सारांश लेखन जास्त अथवा कमी झाल्यास योग्य ते गुण वजा करण्यात येतील.

जंगल 'वारून' शेती करणारा समाज म्हणून 'वारली' या नावाने हा समाज ओळखला जातो. कृषी-संस्कृतीची खोलवर परंपरा असलेला हा समाज आहे. सिंधू संस्कृतीच्या पूर्वी असलेल्या अनेक जमाती भटक्या स्वरूपात होत्या. नवपाषाण युगात या जमाती पशुपालन आणि शेती उद्योगाने स्थिरावल्या. या अनेक जमातींच्या परंपरा वैदिक परंपरेत मिसळून ही नागर स्वरूपाची सिंधू संस्कृती झाली. सिंधू पूर्व असलेल्या या कृषी परंपरा आर्यकुलीन जातीच्या लोकांनी निष्पाद समजल्या तेव्हापासून त्या संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आल्याच नाहीत. वारली समाज याच निष्पाद संस्कृतीचा वंशज आहे.

युरोपात अनेक इझमच्या मालिकेतून आलेला दृक्-प्रत्ययवाद या विचार आणि शैलीशी या वारली चित्र शैलीचं एक साम्य दिसतं. केवळ बौद्धिक आणि तात्विक चित्र न काढता हे चित्रकार मोकळ्या हवेत आणि थेट वास्तव जीवनालाच भिडले.

''मी शहरातला चित्रकार नाही. शहराशी माझं नातंच नाही. मी शेतकरी आहे. मला शेतात परत जायचंय. मला अशा सूर्याच्या प्रदेशात जायचंय की जिथं त्याची उष्णता चित्रकलेच्या इच्छेशिवाय माझ्यातलं सगळं जाळून टाकील,'' ''मी शेतकरीच रंगवतो अन् मला वाटतं, ह्या बायकासुद्धा शेतकरीच आहेत. हाडामांसाचे माळी म्हणू हवं तर. जमीन अन् मांस एकाच गोष्टीची दोन रूपं आहेत ना?'' ही व्हॅन गॉगची विधानं आहेत.

वारली चित्राच्या रचनेतून निर्माण होणाऱ्या लयीतून वेगवेगळ्या धून, नाद जाणवतात. वारली चित्र कायमच समूहाची आहेत. वारली चित्रात चेहरा महत्त्वाचा नसतो. शरीराचे नाक, डोळे असे अलग-अलग अवयव नसतात. समग्रपणे एक देहभान असते. ह्या शरीराकृती कोनातूनच वाकल्याने अतिशय चपळ अन् गतिमान वाटतात.

चित्रकला जमिनीशी निगडित नसणारी कला असली; तरी वारली याला अपवाद ठरून ती जमिनीशी अत्यंत एकरूप झालेली कला आहे. जमिनीच्या भौतिक रूपाशी, डोंगर, नद्या, झाडं एवढयाशीच नाही; तर अख्ख्या परिसराशी ती जोडली गेली आहे. व्यवसायानं वारली जमात शेतकरी असल्याने ती जमिनीशी किती खोलवर जोडलेली आहे हे दिसते.

व्हॅन गॉग म्हणतो, मी शेती काढतो, तेव्हा कणसातील धान्याचा कण आपल्या जन्माकरता झगडताना दिसतो. जिव्या सोमा मशे, व्हिन्सेंट व्हॅन गॉग, रिचर्ड लाँग यांची कलाभिव्यक्ती या बीजाच्या स्पंदनासाठीच आहे. बीज आणि त्याचा अफाट अवकाश, शेती हे चित्रकार आहेत. अशी वरवरची बौद्धिक संशोधनं असली, वरवरची बौद्धिक संबोधनं असली; तरी त्यांची कला श्रमिकाच्या कृतीसारखी आहे. डोंगर, झरे, दगड, पक्षी हे निसर्गघटक नसून निसर्ग अन् जीवन समरसून गेलेल्या शेतीजीवनाचे घटक आहेत. शेतकरी त्याच्या जीवनशैलीत हे घटक वापरतो, तेच घटक व्हॅन गॉग, जिव्या सोमा अन् रिचर्ड लाँग वापरतात. शेतीजीवनाचा खोलवर प्रभाव असलेले हे कलाकार, अन् प्रभावच नाही; तर शेतकरी जीवनच असलेला वारली चित्रकार आहे.

www.reliableacademy.com 9222333999

4. व्याकरण विषयक प्रश्न. 10

(1) 'जळू' या शब्दाचे अनेक वचन लिहा.

(2) 'एकेक मुलगा शक्तिमान आहे'. अधोरेखित शब्दाचा विशेषणाचा प्रकार ओळखा.

(3) पुढील वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

'गुरुजी विद्यार्थ्यांना व्याकरण शिकवितात'.

(4) 'मरावे परी कीर्तिरुपे उरावे' या विधानातील अधोरेखित शब्दाचा अव्ययाचा प्रकार ओळखा.

(5) 'पुण्यामृत' या सामासिक शब्दाचा समास कोणता ते ओळखा.

(6) जेव्हा कोणत्याही काव्यात वा वाक्यात उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ दाखविले जाते तेव्हा कोणता अलंकार होतो?

(7) 'पोर' या शब्दाचे लिंग कोणते?

(8) खालीलपैकी शुद्ध वाक्य कोणते ते ओळखा.

(अ) बुगडी माझी सांडली गं (ब) बुगडि माझी सांडलि ग

(क) बूगडि माझी साडली ग (ड) बूगडि माझि सांडली गं

(9) मराठीत 'पगार' हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे?

(10) पुढील शब्दांबाबत उत्तराच्या अचूक पर्यायाची निवड करा.

कवी, मती, गती, सृष्टी, गुरु

(अ) तत्सम 'इ' कारान्त आणि 'उ' कारान्त शब्द मराठी लेखनात दीर्घ लिहिले जातात त्यानुसार पहिले चार शब्द बरोबर आहेत. परंतु 'गुरु' हा शब्द चूक आहे.

(ब) तत्सम 'इ' कारान्त आणि 'उ' कारान्त शब्द मराठी लेखनात दीर्घ लिहिले जातात त्यानुसार वरील सर्व शब्द बरोबर आहेत.

(क) तत्सम 'इ' कारान्त आणि 'उ' कारान्त शब्द मराठी लेखनात ऱ्हस्व लिहिले जातात त्यानुसार वरील सर्व शब्द चूक आहेत.

(ड) वरील एकही पर्याय योग्य नाही.

-oOo-

www.reliableacademy.com 9222333999